पहिले उड्डाण

टॉम टेट आणि राइट बंधू यांची गोष्ट

लेखक: जॉर्ज शिआ

चित्रे: डॉन बोलोनिस



पहिले उड्डाण

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



प्रकरण एक

1900

किट्टी हॉक, नॉर्थ कॅरोलिना, अमेरिका

एकदा सकाळी टॉम टेट मासे पकडायला गेला. त्याच्या गळाला लागलेला पहिला मासा खूप लहान होता. म्हणून त्याने गळ पुन्हा पाण्यात टाकला. मग त्याच्या गळाला एक मोठा मासा लागला.

“मला आणि बाबांना हा मासा चांगला दोन दिवस पुरेल,” तो स्वत:शी म्हणाला.

समुद्रकिनाऱ्यावर एका तंबूजवळ त्याला दोन माणसे दिसली. ते काय करतायत, हे पाहाण्यासाठी टॉम त्यांच्याकडे गेला.

“हॅलो,” त्यांच्यातील एकजण म्हणाला. “चांगलाच मोठा मासा लागलाय तुझ्या गळाला.”

“मी पकडलेला पहिला मासा बघायला हवा होता तुम्ही,” टॉम म्हणाला. “तो व्हेल माशाएवढा मोठा होता. एवढा मोठ्ठा की मी त्याला खेचून किनाऱ्यावर आणू शकलो नाही.”

ती माणसे हसू लागली. त्यांनी मजेशीर कपडे घातले होते. टॉमला ते दोघे किट्टी हॉक शहरातील वाटले नाहीत.

“माझं नाव *ऑरव्हिल* आहे, *ऑरव्हिल राइट,*” त्यांच्यातील एकजण म्हणाला. “तू मला *ऑर्व्ह* म्हणू शकतोस. हा माझा भाऊ, *विल्बर*.”

“मला *विल* म्हण,” दुसरा माणूस म्हणाला.

“मी टॉम टेट,” टॉम म्हणाला. “तुम्ही किट्टी हॉकमध्ये काय करताय?”

“आम्ही ओहायोतून आलोय, एक उडणारं यंत्र बनवण्यासाठी,” विल म्हणाला.

“ते काय असतं?” टॉमने विचारले.

“तू स्वत:च बघ,” विल म्हणाला. “हे यंत्र एक दिवस हवेत उडेल.”

“कसं काय उडणार ते?” टॉमने विचारले.

“पतंगाला हवा कशी वर उडवते, तसंच या यंत्रालाही हवा उडवेल,” ऑर्व्ह म्हणाला.

“त्यासाठीच आम्ही किट्टी हॉकला आलोय. इथे भरपूर वारे वाहात असतात.”

“इथल्या जमिनीवर मऊशार रेत आहे, त्यामुळे यंत्र सुरक्षितपणे उतरू शकेल इथे,” विल म्हणाला.

“मी बसू त्यात?” टॉमने विचारले.

“अजून बनून तयार झालं नाहीये ते,” विल म्हणाला, “तू परत केव्हा येशील तेव्हा पाहू.”

“ठीकाय,” टॉम म्हणाला. “येईन मी परत.”

टॉम आपले चुलत भाऊ-बहीण, नेड आणि लॉरा, यांच्या घरी धावत निघाला. आपण जणू हवेतच उडू लागलोय, असे त्याला वाटू लागले.

"मी आत्ताच ओहायोतून आलेल्या दोन माणसांना भेटलो," टॉम म्हणाला. "ते म्हणतात की ते पक्ष्यांसारखं हवेत उडणार आहेत."

"अरे टॉम," लॉरा म्हणाली, "तुझ्या बालीश गोष्टी ऐकवू नकोस आम्हाला."

"खरंच सांगतोय," टॉम म्हणाला. "त्यांनी बनवलेलं उडणारं यंत्र पहिलंय मी."

"उडणारं यंत्र असं काही अस्तित्वात नाहीये," नेड म्हणाला. "तू काहीतरी चढवून सांगतोयस."

"थोडं थांबा," टॉम म्हणाला. "मग बघालच तुम्ही!"

नेड आणि लॉरा हसू लागले, पण आपण खरे तेच सांगितले, हे टॉम जाणत होता.



प्रकरण दोन
पुढला दिवस

विल आणि ऑर्व्ह यांना भेटायला जात असताना टॉमला आकाशात पक्ष्यापेक्षा मोठे काही दिसले. ते उडणारे यंत्र होते! तो धावतच समुद्रकिनारी गेला.

विल आणि ऑर्व्ह त्यांचे यंत्र एका पतंगासारखे उडवत होते. टॉमचे बाबा आणि काका बिल त्यांना मदत करत होते.

जेव्हा यंत्र आकाशातून खाली जमिनीवर उतरले, तेव्हा टॉमने विचारले, “तुम्हीसुद्धा उडता का यात बसून?”

“मी उडालोय यातून,” विल म्हणाला, “फक्त एकदाच. पण आज वारा कमी आहे, हे यंत्र माझ्यासोबत वर उचलायला.”

“मी हलका आहे,” टॉम म्हणाला. “मी त्यात बसून उडू शकतो का?”

विलने टॉमच्या वडिलांकडे वळून विचारले, “काय मत आहे तुमचं, मिस्टर टेट?”

“आम्ही त्याला फार उंच नाही जाऊ देणार,” ऑर्व्ह म्हणाला.

“ठीकाय,” वडिल म्हणाले. “पण काळजी घ्या!”

टॉम यंत्राच्या खालच्या पंखांवर पालथा झोपला. मग विल आणि टॉमचे वडील हे दोघे यंत्र उचलून थेट वाऱ्याच्या दिशेत धावू लागले. जेव्हा वाऱ्याने यंत्र वर उचलले, तेव्हा त्यांनी ते सोडून दिले.

यंत्र वर वर जाऊ लागले. टॉम किट्टी हॉक शहराच्या वर हवेत उडू लागला. तो आणखी वर वर जाऊ लागला. अचानक, यंत्र वर-खाली होत थरथरू लागले.

“हलू नकोस टॉम!” विल ओरडला. विल आणि काका बिल यांनी जोर लावून दोर खेचला. मग यंत्र हळूहळू खाली येऊ लागले. यंत्र रेतीत उतरून घसरत थांबले, तेव्हा टॉमने आपले डोळे बंद केले.

“तुला लागलं-बिगलं नाही ना?” त्याच्या वडिलांनी विचारले. “
टॉम उभा राहिला तेव्हा तो हलत होता. “मी ठीकाय,” तो म्हणाला. “मला परत उडायचंय. याच्यापेक्षा उंच जायचंय!”
“नाही,” वडील म्हणाले. “आज एवढंच पुरे.”

घरी परतताना टॉमला नेड आणि लॉरा दिसले.
“आज मी उडणाऱ्या यंत्रात बसलो!” तो म्हणाला.
“आणि आकाशात उंच उडालो!”
“काहीतरी फेकू नकोस,” लॉरा म्हणाली.
“माझे बाबा म्हणतात की उडणारी यंत्र ही निव्वळ बकवास आहे,” नेड म्हणाला. “ते म्हणतात, माणूस उडण्यासाठी जन्माला आला असता तर त्याला जन्मताच पंख नसते का!”
“तुम्ही उद्या समुद्रकिनारी याच,” टॉम म्हणाला.
“कदाचित विल आणि ऑर्व्ह तुम्हालासुद्धा यंत्रात बसायला देतील.”

पुढल्या दिवशी दुपारी, लॉरा आणि नेड समुद्रकिनारी आले, पण तेव्हा वाराच वाहात नव्हता. यंत्र मोठ्या किड्यासारखे मातीत बसून राहिले होते.
“तू कधी यंत्रात बसून उडणार आहेस, टॉम?” लॉराने विचारले आणि ती हसू लागली.
“माझ्याकडे बघ,” नेड म्हणाला. “मी उडतोय!”
तो आणि लॉरा हसतखिदळत आणि आपले बाहू पसरत इथेतिथे धावू लागले.
“थोडं थांबा,” टॉम म्हणाला. “मग बघालच तुम्ही!”

काही दिवसांनी विलने पुन्हा उड्डाण केले. पंधरा सेकंद हवेत उडत त्याने सुमारे चारशे फूट अंतर कापले.

मग तो आणि ऑर्व्हे ओहायोला परतण्यासाठी आपला बाड-बिस्तरा आवरू लागले.

“तुम्ही कायमचे निघून जाताय का?” टॉमने विचारले.

“नाही,” विल म्हणाला. “हे यंत्र चांगलंच आहे. हे वर-खाली जातं, उजवी-डावीकडे वळतं. पण आम्ही हवेत आणखी जास्त वेळ राहू शकेल असं, याच्यापेक्षा चांगलं यंत्र बनवायला घरी चाललोय.”

“पुढल्या उन्हाळ्यात आम्ही परत येऊ, नवं यंत्र उडवायला,” ऑर्व्हे म्हणाला.

“मी येईन तेव्हा, तुम्हाला मदत करायला,” टॉम म्हणाला.

प्रकरण तीन

1901

विल आणि ऑर्व्हि पुढल्या उन्हाळ्यात एक नवे यंत्र घेऊन आले. ते आधीच्या यंत्रापेक्षा दुप्पट मोठे होते.

“हे आजपर्यंत बनवलेलं सर्वात मोठं ग्लायडर आहे,” विल म्हणाला.

“याचे पंख आधीच्या यंत्रापेक्षा जास्त लांब आणि वाकलेले आहेत,” ऑर्व्हि म्हणाला. “हे पंख आम्हाला जास्त वेळ हवेत राहायला मदत करतील, असं वाटतंय.”

प्रथम विलने उड्डाण केले. तो थोडा वेळ हवेत उडत राहिला.



पण अचानक यंत्र फिरू लागले आणि वेगाने खाली पडू लागले.

“थांब विल!” ऑर्व्ह ओरडला.

यंत्र खाली जमिनीवर येऊन जोरात आदळले.

“ठीक आहेस का तू?” टॉमने विचारले.

विलच्या डोळ्याला आणि नाकाला मार लागला होता, पण काही गंभीर इजा झाली नव्हती. विल आणि ऑर्व्ह यांना यंत्राची डागडुजी करावी लागली. त्यांनी मदतीसाठी टॉमच्या वडिलांना कामावर ठेवले. काही दिवसानी, यंत्र पुन्हा उडण्यास सज्ज झाले. पण अजून काहीतरी अडचण होती त्यात. कधी ते मध्येच थांबत असे, कधी फिरतफिरत जमिनीवर पडत असे.

“काही गडबड आहे त्यात?” टॉमने विचारले.

“माहीत नाही आम्हाला,” ऑर्व्ह म्हणाला.

“त्यांना कळलं नसावं, काय गडबड आहे ते,” टॉमचे वडील म्हणाले. “पण तू यापुढे या यंत्रात बसायचं नाहीस. ते सुरक्षित नाही.”



विल आणि ऑर्व्ह यांनी यंत्रात बरेच बदल करून पाहिले, पण प्रत्येकवेळी ते अपयशी ठरले. शेवटी, त्यांनी ओहायोला परतायचे ठरवले.

“तुम्ही हार तर मानली नाही ना?” टॉमने विचारले.

“आणखी हजार वर्षतरी माणूस उडू शकणार नाही, असं वाटू लागलंय,” विल म्हणाला.

विल आणि ऑर्व्ह समुद्रकिनाऱ्यापासून दूर जाताना टॉमने बघितले. आता ते आपल्याला पुन्हा कधीच दिसणार नाहीत, असे त्याला वाटू लागले.

चौथे प्रकरण

1902

हळूहळू हिवाळा सरत गेला. एकदा टॉमला ऑर्व्हकडून एक पत्र आले.

“आम्ही वेगळ्या प्रकारचे पंख वापरून नवं यंत्र बनवलंय,” टॉम वाचू लागला. “याचे पंख खूपच लांब आणि रूंद आहेत. आम्ही संतुलन सांभाळण्यासाठी आणि यंत्र सहज वळवण्यासाठी यंत्राला एक शेपूटही जोडलंय. ते उडवून पाहायला आम्ही किट्टी हॉकला परत येतोय.”

सप्टेंबर महिन्यात विल आणि ऑर्व्ह परतले. त्यांनी टॉमच्या वडिलांना पुन्हा एकदा कामावर ठेवले.

नवे यंत्र जुन्या यंत्रापेक्षा खूप चांगले उडाले. विल आणि ऑर्व्ह यांनी हजारेक उड्डाणे केली त्यातून.



“आत्ता कुठे आमच्या मनासारखं झालं यंत्र,” विल म्हणाला. “आता त्याचं नियंत्रण करू शकतो आम्ही, हवं तेव्हा ते वर नेऊ शकतो आणि हवं तेव्हा खाली आणू शकतो.”

“हवं तसं वळवूपण शकता,” टॉम म्हणाला.

“पण एक गोष्ट अजून करत नाहीये हे,” विल म्हणाला. “वारा असल्याशिवाय उडू शकत नाही ते.”

“आम्ही त्याला एक इंजिन बसवणार आहोत,” ऑर्व्ह म्हणाला. “मग ते स्वत:हून उडेल, वाऱ्याशिवाय. तो एक ऐतिहासिक क्षण असेल. आपण पक्ष्यांसारखं कधीही, कुठेही उडू शकू!”

त्या हिवाळ्यात, ओहायोमध्ये, विल आणि ऑर्व्ह यांनी इंजिन आणि प्रोपेलर बनवले. यंत्र हवेत पुढे नेण्यासाठी त्याचा उपयोग होणार होता.

पण ते उडेल का?

हे कळण्यासाठी त्यांना किट्टी हॉकला जावे लागणार होते.

प्रकरण पाच

1903

विल आणि ऑर्व्हं यांनी नवे यंत्र किट्टी हॉक येथे आणले. पण त्याचवेळी प्रोपेलर नादुरुस्त झाले. नवे प्रोपेलर बनवण्यासाठी ऑर्व्हला पुन्हा ओहायोला जावे लागले.

तो परतला तेव्हा वादळी वाऱ्यांमुळे यंत्र उडवणे धोक्याचे होते.

एके दिवशी, एका भयंकर वादळानंतर, टॉमचे वडील म्हणाले, “या वादळात यंत्र उडवणं अशक्य आहे. त्यांनी आपले उडण्याचे प्रयोग थांबवले नाहीत तर कुणालातरी गंभीर इजा होऊ शकते. मला तुला इजा होऊ द्यायची नाहीये, टॉम. तू त्यांच्यापासून दूरच राहा.”

“पण बाबा,” टॉम म्हणाला, “विल आणि ऑर्व्हं माझे चांगले मित्र आहेत.”

“तरी आत्ता उडणं धोकादायक आहे,” बाबा म्हणाले.

टॉमला विल आणि ऑर्व्हं यांची आठवण येत असे. यंत्राचे विचारही त्याच्या मनात पिंगा घालत. पण हवामान दिवसेंदिवस बिघडतच चालले होते. अशावेळी त्यांनी उडायचा प्रयत्न केला तर?





बाबा झोपल्यावर, टॉम घरून निघाला आणि समुद्रकिनारी पोहोचला. किनाऱ्यावर विल आणि ऑर्व्हे यांच्या शिबिरापाशी जीवनरक्षक केंद्रातील बचावकार्य करणारे काही कर्मचारी उभे होते. हे कर्मचारी समुद्रात अडकलेल्या खलाशांना वाचवण्याचे काम करत. विल आणि ऑर्व्हे यांच्याबाबत काही दुर्घटना तर नाही ना घडली?

17 डिसेंबर रोजी कडाक्याची थंडी पडली होती. कर्कश्श आवाज करणाऱ्या वेगवान वाऱ्यामुळे टॉमच्या घराच्या खिडक्या हलू लागल्या. “अशा वादळी वाऱ्यामध्ये यंत्र उडवण्याचा प्रयत्न करणे हा वेडेपणा ठरेल,” टॉमचे बाबा म्हणाले. “मी जातो पुन्हा झोपायला.”

मग टॉमला दोघे भाऊ दिसले.
“आम्ही आज उडण्याचा प्रयत्न करून पाहातोय,” ऑर्व्ह म्हणाला. “आम्हाला मदत करण्यासाठी ही माणसंसुद्धा आलीयत.” टॉमने यंत्र लांब लाकडी रुळांवर ठेवण्यास त्यांना मदत केली. सगळी तयारी झाली. पण वाऱ्याचा वेग कमी झाला नव्हता.



“हीच संधी आहे, ऑर्व्ह,” विल म्हणाला.
दोघे भाऊ बराच वेळ एकमेकांकडे बघत राहिले, जणू काही ते एकमेकांना पुन्हा कधीच भेटणार नव्हते.
मग ऑर्व्ह त्यांच्या यंत्रात जाऊन बसला.
“शुभेच्छा, ऑर्व्ह!” टॉम ओरडला.



प्रकरण सहा

त्याच दिवशी

ऑर्व्हने इंजिन सुरू केले. सर्वांनी आपला श्वास रोखून धरला.



वारा अधिकाधिक वेगाने वाहू लागला. ऑर्व्हला अशा वाऱ्यातच यंत्र उडवावे लागणार होते.

यंत्र रुळांवरून चालू लागले. सुरुवातीला ते वाऱ्याच्या विरुद्ध हळूहळू, अत्यंत धीम्या गतीने पुढे चालू लागले.

अचानक टॉमने बाबांची हाक ऐकली.

“टॉम! काय करतोयस तू इकडे?”

“बाबा, बघा!” टॉम ओरडला.





त्याचवेळी यंत्र हवेत झेप घेऊ लागले. वेगवान वाऱ्यांमध्ये ते पिसाटलेल्या पक्ष्यासारखे वर-खाली उसळ्या घेऊ लागले. पण ते उडू लागले, हे महत्त्वाचे!

सर्वांनी मोठा जयघोष केला, अगदी टॉमच्या बाबांनीसुद्धा!

“यांनी तर कमालच केली!” बाबा म्हणाले.

“वाटलं नव्हतं, ते यंत्र उडवू शकतील असं.”

यंत्राने फक्त बारा सेकंद उडत केवळ एकशेवीस फूट अंतर कापले. पण तेवढे पुरेसे होते.

इतिहासात प्रथमच, मानवाने एका यंत्राला नियंत्रित करून त्याच्या इंजिनाच्या जोरावर उड्डाण केले होते.

विल आणि ऑर्व्हे यांनी त्या सकाळी आणखी तीन उड्डाणे केली. शेवटच्या उड्डाणानंतर, सर्वजण किट्टी हॉकला गेले.



लोक विल आणि ऑर्व्ह यांच्याशी हस्तांदोलन करत त्यांची प्रशंसा करू लागले, “कमाल केलीत तुम्ही!”

लॉरा आणि नेड हेदेखील तिथे आले होते. “हे खरंय का, टॉम?” त्यांनी विचारले.

“अर्थात खरंय,” टॉम म्हणाला. “मी सांगितलं होतं ना, विल आणि ऑर्व्ह उडणार म्हणून.”

“टॉमने आम्हाला उडायला चांगली मदत केली,” विल म्हणाला.

“पुन्हा केव्हा उडणार तुम्ही?” लॉराने विचारले.

“विल आणि मी ख्रिसमससाठी घरी चाललोय,” ऑर्व्ह म्हणाला, “पण परत नक्की येऊ आम्ही.”

“ते परत येतील तेव्हा मला यंत्र उडवायला देणार आहेत,” टॉम म्हणाला. “मी ते उडवत चंद्रावर घेऊन जाणार!”

“तू गोष्टी रचून सांगणं बंद करशील का, टॉम!” लॉरा म्हणाली.

“चंद्रावर कुणीच उड्डाण करू शकत नाही,” म्हणत नेड हसू लागला.

“थोडं थांबा,” टॉम म्हणाला. “मग बघालच तुम्ही!” “

समाप्त